# प्रेस नोट

दिनांक ०२/०६/२०२२

**आरोपी लोकसेवक संतोष गंगाराम गुंजीटे वय २८ वर्ष व्यवसाय कनिष्ठ अभियंता, वर्ग—३ ग्रामीण महावितरण कार्यालय, शाखा—२ पुर्णा ता.पुर्ण जि.परभणी सध्या रा.आनंद नगर पुर्णा मूळ रा.येलोरी ता.औसा जि.लातुर यांनी २,०००/— रू लाच स्विकारलेची यशस्वी सापळा कारवाई**

यातील तक्रारदार माधव सिध्दराम दुधाटे वय ३५ वर्षे व्यवसाय शेती रा. खांबेगाव ता. पुर्णा जि.परभणी यांनी ला.प्र.वि.कार्यालय परभणी येथे दि.०२/०५/२०२२ रोजी तक्रार दिली की, त्यांना एक भाउ नामे सदाशिव हा असुन ते दोघे एकत्र राहतात. सदाशिव याचे नावे तिन एकर शेती आहे. सदर शेतीमध्ये सोलार पंप मंजुर झाला असुन शेतात पंप बसवण्यासाठी एमएसईबी कार्यालयाकडुन विद्युत जोडणी नसल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.. त्यासाठी त्यांनी दोन दिवसापुर्वी एमएसईबी कार्यालय पूर्णा येथे जावून गुंजेटी उप अभियंता यांना ते भेटले असता गुंजेटी यांनी त्यांना ६०००/— रू. लाचेची मागणी केली त्यावेळी त्यांनी गुंजेटी यांना ३०००/— रू दिले. परंतू गुंजेटी हे आणखी ३०००/— रू. लाचेची मागणी करीत आहेत. त्यांचे विरूध्द कार्यवाही करावी अशा मजकुरची तक्रार दिली. सदर तक्रारीवरून त्याच दिवशी दि.०२/०६/२०२२ रोजी दोन शासकीय पंचांचे समक्ष ग्रामिण महावितरण कार्यालय शाखा १—२ पूर्णा येथे करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे संतोष गंगाराम गुंजिटे वय २८ वर्ष, व्यवसाय कनिष्ठ अभियंता वर्ग—३, ग्रामिण महावितरण कार्यालय शाखा—२ पूर्णा, रा. येलोरी ता. औसा जि. लातुर ह.मु. आंनद नगर पूर्णा ता. पूर्णा जि. परभणी यांनी पंच क्र. १ अंभोरे यांचे समक्ष तक्रारदार माधव दुधाटे यांना त्यांचे भावाचे शेतात विद्युत जोडणी नसल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी ३०००/— रू. लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०००/— रू. लाचेची मागणी केली.

त्याच दिवशी दि.०२/०६/२०२२ रोजी ग्रामिण महावितरण शाखा १—२. पूर्णा कार्यालयासमोर करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे संतोष गुंजिटे यांनी तक्रारदार यांचे कडुन पंच क्र.१ अंभोरे यांचे समक्ष लाचेची रक्कम २०००/— रूपय स्विकारली असता आलोसे यांना लागलीच ताव्यात घेतले असुन त्यांचे विरूध्द पो.स्टे.नानलपेठ, परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, डॉ. श्री. राजेंद्र शिंदे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड व मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. धरमसिंग चव्हाण, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस उप अधिक्षक श्री. किरण बिडवे यांचे निरीक्षणात पोलीस निरीक्षक श्री. सदानंद वाघमारे, पोलीस निरीक्षक श्री. बी. आर. जकिकोरे, पोह/हनुमंते, पोह/निलपत्रेवार, पोना/कटारे, कुलकर्णी, पोशि/कदम, मुक्तार, मपोशि/दंडवते चापोना/.कदम, चासपोउपनि/शेख हबीब लाप्रवि परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकांविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणाऱ्या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक 02452—220597** **Email ID - dyspacbparbhani@gmail.com** **टोल फ्री क्रमांक 1064**

डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड —8888807299
श्री.धरमसिंग चव्हाण, अप्पर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नांदेड परिक्षेत्र नांदेड —9923417076
श्री.किरण बिडवे, पोलीस उप अधिक्षक, ला.प्र.वि.परभणी —7020224361
श्री.सदानंद वाघमारे,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी —9823616142
श्री. बसवेश्वर जकिकोरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी —9881141218